# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/01/2023 (बुधवार) दुपार

---

### चोरी

**पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत २३ किमी अंतरावर महालगाव इंडीयन पेटोलंपप, महालगाव कामठी येथे दिनांक १६.०१.२०२३ ते दिनांक १७/०१/२०२३ चे २३.३० वा. ते ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रदिप हरीशंकर शर्मा, वय ३० वर्ष, रा. गुठीना ता. मूरार जि. ग्वालीयर ठाणा महाराजपुरा राज्य मध्यप्रदेश हे मौदा डहाडी येथील हिंडाल्को कंपनी येथुन निघाले आणि महालगाव इंडीयन पेटोलंपप येथे रात्री ११.३० वा. से १२.०० वा. पोहचले व दिनांक १७/१/२०२३ रोजी सकाळी ६.०० वा. फिर्यादी फ्रेश होण्याकरिता गेले असता फिर्यादीच्या ट्रक च्या डिझेल टंकीचे झाकण खुले दिसले व डिझेल खाली सांडलेले होते. ट्रक कंटेनर क्र. यु.के –०८ सी.बी.–१८८५ च्या टंकी मधुन ४३० लिटर डिझेल किंमती अंदाजे ३९,५६०/– रू. असा एकुण ३९,५६०/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ११७४ यंगलवार हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर